CAREERINDIA

Language Code : **11**

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

# JSS-24-I

**प्रश्न-पत्र-I / PAPER-I**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग-IV & V / PART-IV & V**

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code
**C**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **C**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **C**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ______________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ______________________
: शब्दों में / in words ______________________

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ______________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ______________ निरीक्षक के हस्ताक्षर : ______________
Candidate's Signature : Invigilator's Signature :

Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ______________________

www.careerindia.com

CAREERINDIA

Language Code : **11**

ही पुस्तिका 20 पृष्ठ आहे.

# JSS-24-I

**प्रश्नपत्रिका-I**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

चाचणी पुस्तिका कोड

**C**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV ( भाषा I ) **किंवा** भाग V ( भाषा II ) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड C** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______________________

www.careerindia.com

CAREERINDIA

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **( प्रश्न क्र. 91** ते **120 )** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

www.careerindia.com

CAREERINDIA

**भाग–IV**

**भाषा–I**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

माझे गंधाचे वा सुगंधाचे वेड गावरान पद्धतीचे आहे आणि गावरानाने ते जोपासलेले आहे. हे लहानपणापासूनचे आहे. तेव्हापासूनच माझी गंधग्रहणशक्ती मोठी तीव्र असावी. चवीचे जेवण झाले, की हात धुवून, परकराला पुसून, हाताचा द्रोण करून त्यात नाक बुडवून भरभरून वास घ्यायचा ही माझी नेहमीची आवड. कांद्याची खमंग आमटी. सायीचे दही नि भात यांचे जेवण करावे आणि त्या संमिश्र वासाचा आनंद मनसोक्त लुटावा. अजून मला असे करावेसे वाटते. आईने ठेवणींची पेटी उघडली, की प्रत्येक वस्त्राची घडी प्रथम माझ्या नाकावर मी घेई. तो नव्या, पण जुन्या कपड्यांचा गार सुगंध मला फार आवडायचा. गर्द रानातील वृक्षांचा वास, भुईमुगाचे ओले वेल उपटल्यावर त्यांना येणारा दुधाळ हिरवा उग्र वास, तुरकाठ्याच्या जळणावर तापविलेल्या दुधाचा वा चहाचा वास ... किती नि किती तऱ्हेचे वास मी लहानपणी अनुभवले असतील. मनात भरून ठेवले असतील.

ज्या तवंदीगाव या खेड्यात माझी लहानपणची चार–पाच वर्षे आणि शिकत असतानाच्या सुट्टीचे दिवस गेले, त्या तवंदीत ही माझी आवड जोपासली गेली. तेव्हाची एक गोष्ट आठवते. आमची शेती असल्याने घरात बैल, गाई, घोडे, म्हैस अशी गोठाभर गुरे होती. त्यात नेहमी पाच–सात लहान मोठी वासरे असायचीच. या वासरांसाठी जोंधळ्याची कोवळी ताटे रोज कुणी शेतातून आणायचे. ती कुऱ्हाडीने तोडून त्याचे बोटभर लांबीचे तुकडे करून मी ते वासरांना घालीत असे. तुकडे करण्यासाठी आमच्या सतबा पाटलांनी मला लहान पात्याची कुऱ्हाडही दिली होती. बाटूक तोडून सुपात घेतले, की त्याचा किती वास घेतला तरी मला पुरे व्हायचे नाही. कुणाला वाटायचे, मी चोरून ते खातेच आहे. पण त्याचा गंध ... सालांचा औषधी वास, कोवळ्या भेंडाचा निरशा दुधासारखा वास आणि पानांचा येणारा जिरेसाळीच्या भातासारखा वास ... त्यांचे मिश्रण म्हणजे मला पंचपक्वान्नांचे जेवणच वाटायचे. सतबा पाटील ओरडायचे तेव्हा मी सुपातून नाक काढायची.

निरनिराळ्या गावांतील खूप बागा मी पाहिल्या आहेत. देखण्या, तशाच मिश्र सुगंधाने घमघमणाऱ्या. पण या बागांना माझ्या मनात स्थान नाही. त्या मी विसरले. मुंबईला असताना आमच्या घरी सुक्या पानात मळकट दोऱ्याने गुंडाळलेली फुलाची एक पुडी रोज येई. देवासाठी ती उलगडली, की जो असेल तो वास येई. त्या वासाने माझ्या मनात तवंदीची ब्रह्माची बाग उभी राही. मला वाटते, गंधाच्या कणात ही एक मोठी शक्ती असावी. डोंगरावर गाव, डोंगराच्या तळाशी ब्रह्माचे देऊळ. तेथून खाली दगडी बांधीव पायऱ्यांवरून गेले, की मग खूप मोठे वृक्ष आणि एक फळ्यांचा लहानसा पूल, वहाळावर बांधलेला. डोंगरातून वाहून येणाऱ्या पाण्यावर ती बाग उभी केलेली. बागेत आतील बाजूला एक मोडकी झोपडी. शेजारी घमघमणारा हिरवा चाफा आणि पुढे ओल्या गार वाफ्यातील फुलझाडांचे हिरवेगार गंधच गंध. लहान पाटातून वाहणारे पाणी, काठाने कर्दळीची झाडे; कुठे सुपारीची, कुठे केळीची रांग. मध्ये वाफेच वाफे. निशिगंधाचे, कृष्णकांचनाचे, चटक चांदणीचे, मोगऱ्याचे, हळदीचेही. तुळशीचा तर केवढा मोठा चौक. त्या बागेचा संमिश्र गंध मला दुसरीकडे कोठेच जाणवला नाही.

**91.** पुढीलपैकी संख्यावाचक विशेषण ओळखा :

(1) उग्र–वास (2) ओले–वेल (3) पाच–सात (4) लहान–मोठी

www.careerindia.com

CAREERINDIA

**92.** फुलांच्या पुडीचा वास घेतल्यावर लेखिकेसमोर काय उभे रहात असे ?

(1) ब्रह्माचे देऊळ (2) घमघमणारा हिरवा चाफा

(3) ब्रह्माची बाग (4) मुंबईची बाग

**93.** पुढीलपैकी सामान्यनाम **नसलेला** शब्द ओळखा :

(1) नदी (2) देव (3) झाड (4) पाणी

**94.** बागांमधून येणारा सुगंध कसा आहे ?

(1) मिश्र (2) गार (3) दुधासारखा (4) उग्र

**95.** लेखिकेला दुधाळ हिरवा उग्र वास कशाचा येतो ?

(1) कांद्याच्या खमंग आमटीचा

(2) आईच्या ठेवणीच्या वस्त्राचा

(3) तुरकाठ्याच्या जळणावर तापविलेल्या दुधाचा

(4) भुईमुगाच्या ओल्या वेलीचा

**96.** 'त्या तवंदीत ही माझी आवड जोपासली गेली' यातील अधोरेखित कोणते क्रियापद आहे ?

(1) संयुक्त क्रियापद (2) सकर्मक क्रियापद

(3) सहायक क्रियापद (4) अकर्मक क्रियापद

**97.** जोंधळ्याच्या कोवळ्या ताटांचे तुकडे लेखिका कोणाला घालीत असे ?

(1) वासरांना (2) म्हशींना (3) बैलांना (4) घोड्यांना

**98.** 'सरिता' या शब्दाच्या अर्थाचा कोणता शब्द उताऱ्यात आलेला आहे ?

(1) पाणी (2) सुगंध (3) नदी (4) बाग

**99.** 'निरनिराळ्या गावांतील खूप बागा मी पाहिल्या आहेत'. यातील अधोरेखित शब्द कोणते विशेषण आहे ?

(1) आवृत्तिवाचक संख्याविशेषण (2) अनिश्चित संख्याविशेषण

(3) साकल्यवाचक संख्याविशेषण (4) पूर्णांकवाचक संख्याविशेषण

www.careerindia.com

CAREERINDIA

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

घन घुंगुरवाळा आला.
कौलांवर रुणुझुणु झाला.

या फांद्यांवर तान्हेल्या
हळुवार सरी थरथरल्या;
हा पाउस की फुलझेला ?
घन घुंगुरवाळा आला.

लाजरे पाखरू भिजले,
मातीतुन गाणे रुजले;
नादात आपुल्या न्हाला,
घन घुंगुरवाळा आला.

पालखी नव्या नवलाची,
सावळिया शुभ शकुनाची
घेउनी निघाली याला,
घन घुंगुरवाळा आला.

**100.** 'मातीतुन गाणे रुजले' या ओळीतून काय सूचित होते ?

(1) नवनिर्मितीची प्रेरणा (2) घुंगुरवाळ्याचे महत्त्व
(3) मातीचे महत्त्व (4) पावसाचे महत्त्व

**101.** 'पालखी' हे कशाचे प्रतीक आहे ?

(1) मातीच्या गाण्याचे (2) सरींच्या आनंदांचे (3) शुभ शकुनाचे (4) सावळेपणाचे

**102.** 'लाजरे पाखरू भिजले
मातीतून गाणे रुजले'
यातील विशेषण कोणते ?

(1) भिजले (2) रुजले (3) लाजरे (4) पाखरू

www.careerindia.com

CAREERINDIA

**103.** ढगासाठी कवितेत न वापरलेला शब्द कोणता ?

(1) घुंगुरवाळा (2) पालखी (3) घन (4) सावळिया

**104.** 'हळुवार सरी थरथरल्या' यातील 'सरी' हे काय आहे ?

(1) भाववाचक नाम (2) कर्म

(3) नाम (4) समूहवाचक नाम

**105.** 'फुलझेला' ही उपमा कोणाला दिलेली आहे ?

(1) नदीला (2) पालखीला (3) पाखराला (4) पावसाला

**106.** __________ या प्रकारच्या शिक्षणात मुलाला बुद्धिमत्ता नि तर्क यासारख्या वरच्या पातळीवरच्या प्रक्रियेची गरज भासते.

(1) गतिबोधन शिक्षण (2) संरचनात्मक शिक्षण

(3) मौखिक शिक्षण (4) संकल्पना शिक्षण

**107.** पुढीलपैकी कोणत्या उपक्रमातून विद्यार्थ्यांची मौखिक भाषा विकसित करण्यासाठी शिक्षकांना मदत मिळते ?

(1) भूमिकाभिनयात सहभाग

(2) नवीन किंवा माहीत नसलेल्या शब्दांचे योग्य उच्चारणाचा सराव

(3) शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी पाठ मोठ्याने वाचणे

(4) कविता पाठ करून तिचे पठन

**108.** तुम्ही हिंदी भाषक शिक्षक आहात आणि तुमची बदली पंजाब परिसरातील प्राथमिक शाळेत होते. आता तुम्हाला तिथली भाषा येत नाही. त्यामुळे तुम्ही काय केले पाहिजे ?

(1) इंग्रजीत बोलावे.

(2) मुलांना हिंदी शिकण्यास प्रोत्साहन द्यावे.

(3) लगेच हिंदी परिसरात बदली करून घेण्यासाठी अर्ज करावा.

(4) मुलांच्या भाषेचा साधन म्हणून वापर करत अध्यापन सुरू करावे.

www.careerindia.com

CAREERINDIA

**109.** पाठ्यपुस्तकाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

(1) सत्रासाठी शैक्षणिक उपक्रमांचे नियोजन असते.

(2) पाठ्यपुस्तकांना काहीही पर्याय नाही.

(3) पाठ्यपुस्तक हे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी अंतिम असते.

(4) अभ्यासक्रमातील उद्दिष्टांची पूर्तता करण्यास मदतरूप ठरते.

**110.** काही शब्द चुकीचे लिहिलेले असतानाही तुम्ही विद्यार्थ्यांच्या एकूण भाषा वापराचे कौतुक करता. तुम्ही तुमच्या वर्गात __________ या पद्धतीचा वापर करता.

(1) रचनात्मक (Constructivist) (2) संरचनात्मक (Structural)

(3) समग्र भाषा (4) संज्ञापनात्मक

**111.** वर्गात मातृभाषा वगळणे हे पुढीलपैकी कोणत्या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे ?

(1) श्रव्यभाषिक (2) थेट (3) नैसर्गिक (4) द्वैभाषिक

**112.** पाचवी इयत्तेचे शिक्षक म्हणून तुम्ही विद्यार्थ्यांना पाठ काळजीपूर्वक वाचायला सांगता. नंतर तुम्ही विद्यार्थ्यांना प्रश्नांची ससंदर्भ उत्तरे द्यायला सांगता. या प्रक्रियेतून तुम्ही विद्यार्थ्यांचे कोणत्या प्रकारे उत्तेजन देता ?

(1) चाळणे (2) गहन वाचन (3) विस्तृत वाचन (4) न्याहाळणे

**113.** 'मजकुरातून विशिष्ट प्रकारची माहिती मिळविण्यासाठी तिचे बारकाईने आणि लक्षपूर्वक वाचणे'. या प्रकारच्या कौशल्याला __________ आकलन म्हणतात.

(1) अनुमान (2) मूल्यमापनात्मक (3) जागतिक (4) स्थानिक

**114.** भाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया घडते जेव्हा __________.

(1) मुलाला वाचनाची संधी दिली जाते

(2) मुलाला भाषेच्या संपर्कात आणले जाते

(3) मुलाला व्याकरणाचे नियम शिकवले जातात

(4) मुलाला भाषांतराचा सराव करून दिला जातो

www.careerindia.com

115. व्याकरण शिक्षणाची निगमन पद्धती (Deductive approach) या गोष्टीचा पुरस्कार करते की आपण, __________.

(1) प्रामाणिक संभाषण करावे
(2) अभ्यास घटक देऊन सराव करून घ्यावा
(3) उदाहरणे द्यावीत
(4) नियम सांगावेत

116. 'भाषा स्वच्छंदी असते' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा आपल्याला __________ म्हणायचे असते.

(1) भाषेतील शब्द आणि अर्थ यांच्यात कोणताही अंगभूत संबंध नसतो.
(2) भाषा पूर्वप्रत्यय सिद्धांताचे अनुकरण करते.
(3) भाषेतील शब्द आणि अर्थ यांच्यात अंगभूत संबंध असतो.
(4) शब्द आणि अर्थ यांच्यातील संबंध योगायोगाने नसून त्याला योग्य आधार असतो.

117. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मुक्त लेखनासाठी प्रवृत्त करावे; कारण मुक्त लेखनाचा विद्यार्थ्यांना महत्त्वाचा फायदा होतो. योग्य पर्याय निवडा.

(1) त्यांना असे वाटत नाही की त्यांना खूप लिहायचे आहे आणि अचूक लिहायचे आहे.
(2) त्यांच्या प्रथम भाषेतील काही महत्त्वाची वैशिष्ट्ये लेखनात समाविष्ट करता येतात.
(3) यामुळे विद्यार्थ्यांना ओघवते आणि कल्पकतेने लिहिण्यास उत्तेजन मिळते.
(4) लिहायचे किंवा नाही याचे स्वातंत्र्य असते.

118. एखाद्या विषयावर खूप चिंतन करूनही एका मुलाला स्वतंत्रपणे एखादा परिच्छेदही लिहू शकत नाही. मात्र हेच लेखन तो मोठ्या माणसाच्या किंवा मित्राच्या मार्गदर्शनात लिहू शकतो. हे मार्गदर्शन म्हणजे __________.

(1) मित्राचे मार्गदर्शन (Peer Counseling)
(2) समूह शिक्षण (Team Teaching)
(3) परातीकरण (Scaffolding)
(4) मित्राचे शिक्षण (Peer Teaching)

119. सत्याच्या पलिकडे जाऊन अंदाज लावणे, अनुमान करण्याची पद्धत म्हणजे __________.

(1) अनुमान करणे (Inference)
(2) भाकित करणे (Extrapolation)
(3) स्पष्टीकरण
(4) विश्लेषण

120. भाषा शिक्षणात नैदानिक चाचणी (Diagnostic Test) चा वापर कोणत्या उद्दिष्ट पूर्तीसाठी केला जातो ?

(1) विद्यार्थ्यांच्या उणिवा जाणून घेऊन उपचारात्मक पावले उचलणे.
(2) विद्यार्थ्यांच्या निकालातील माहिती मिळविण्यासाठी.
(3) समाकलित मूल्यमापनासाठी प्रश्न तयार करणे.
(4) PTM बैठकीत पालकांना सांगणे आणि त्यांना लक्ष देण्यास सांगणे.

www.careerindia.com

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र. 121** ते **150** ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

→

CAREERINDIA
www.careerindia.com

CAREERINDIA

**भाग–V**

**भाषा–II**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

आंबा नावातच गोडवा आहे. केळी, सफरचंद, पपई आणि अनेक फळं वर्षभरच हजर असतात, पण आंबा दोन महिन्यांसाठीच येतो आणि सगळ्यांची विकेट काढतो. हिंदी भाषेत याला 'आम' म्हणतात, पण खऱ्या अर्थाने हा 'खास' आहे. याच्या अनेक प्रजाती आहेत. हापूस, लंगडा, बदामी, दशेरी, केसर, नीलम आणि हो तो पोपटनाक्या तोतापुरी.. मराठी माणसासाठी हापूस म्हणजे जीव की प्राण. काहींसाठी तर आंबा म्हणजे फक्त हापूस. हापूस म्हणजे सुवासिक, पिवळा धमक, काहीशी केशरी झाक असलेला, विचार केला तरी तोंडाला पाणी सुटतं, बघा ना..

हापूस साधारणपणे एप्रिल मे महिन्यात बाजार व्यापून टाकतो. रत्नागिरी हापूस, देवगड, पावस, मंडणगड ही नावं तो फळवाला आपल्याला सांगतो आणि मग घासाघीस आणि चर्चेला विषयच राहत नाही. 'नक्की रत्नागिरी ना' असे जुजबी विचारत आपण या फळांच्या राजाला आपल्या पिशवीत मानाचे स्थान देतो.

मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशमध्ये 'लंगडा'ला महत्त्व जास्त. याला लंगडा नाव कसे पडले हे कोडेच आहे, पण नाव लंगडा असूनही विक्री आणि रसनेच्या शर्यतीत हा पहिला नंबर पटकावणारा, आंब्यांच्या इतर जाती जशा पिकल्यावर किंवा तयार झाल्यावर आपला रंग बदलतात तसे लंगडाच्या बाबतीत होत नाही, तो कच्चा असताना हिरवा आणि पिकल्यावरही हिरवाच. बाजारात पहिला नंबर मात्र बदामीचा, कर्नाटकचे हे फळ साधारणपणे मार्चपासून दिसू लागते. केसर किंवा गीर केसर आंबा म्हणजे स्वाद आणि सुवासाचे अप्रतिम मिश्रण.

माणसांच्या नावांसारखी नावं असलेल्या काही प्रजाती आहेत. कॅरेबियन बेटातील 'जुली', त्रिनिदादचा 'ग्रॅहम', अमेरिकेतील 'रुबी' आणि 'फोर्ड', भारतात 'मनोहर', 'नीलम', 'मल्लिका' यात जुलीचे वैशिष्ट्य म्हणजे याचा आकार अंडाकृती किंवा गोलाकार असतो. 'रासपुरी' नाव ऐकलेलं वाटत नाही ना.. आपल्याकडे म्हणजे महाराष्ट्र किंवा उत्तर भारतात याची तितकीशी ओळख नाही, पण दक्षिण भारतात हा खूपच प्रसिद्ध. हे फळ चवीला अप्रतिम आहेच, पण नावाप्रमाणे यात भरपूर रस असतो म्हणूनच यांचे नामकरण रासपुरी झाले असावे. असाच 'बंगनपल्ले' हा आंध्र प्रदेशात आपल्या हापूसप्रमाणे प्रसिद्ध. बंगनपल्ले राजवट हे याचे मूळ असल्यामुळे हा आंबा त्याच नावाने ओळखला जातो.

आंबा हा फक्त जिव्हेचे चोचले पुरवत नसून शरीरासाठीही अत्यंत गुणकारी आहे. मुख्य म्हणजे बलवर्धक आहे आणि पोटाच्या अनेक विकारांवर उपायकारक आहे. आंबा खाल्ल्यामुळे शरीराला व्हिटॅमिन अ, इ, उ, ए आणि ङ मिळतं. आंब्यात मँगीफेरीन नावाचे अँटिऑक्सिडंट असतं, तसंच पोटॅशियम आणि मॅग्नेशियममुळे हृदयसंबंधी रोग होण्याची शक्यता कमी असते. आणि हो, हे सर्व गुण असल्यामुळे आंब्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती म्हणजेच इम्युनिटी वाढते. आयुर्वेदानेही आंबा श्वास, त्वचा आणि आमाशयासाठी उपयुक्त मानला आहे. युनानी वैद्यकशास्त्रानुसार क्षयरोगाच्या उपचारासाठी पिकलेले आंबे अतिशय उपयुक्त असतात.

**121.** पुढीलपैकी कोणत्या शब्दाचे अनेकवचनी रूप 'ए' कारान्त होते ?

(1) जीभ (2) रसना (3) प्रजाती (4) माणूस

www.careerindia.com

CAREERINDIA

**122.** लेखकाच्या मते विक्रीच्या बाबतीत पहिला क्रमांक कोणाचा ?

(1) दशेरी (2) केशर (3) लंगडा (4) हापूस

**123.** उताऱ्याप्रमाणे मार्च महिन्यापासून बाजारात दिसू लागणारे फळ कोणते ?

(1) लंगडा (2) दशेरी (3) बादामी (4) केसर

**124.** आंब्यामुळे काय होते ? चुकीचा पर्याय शोधा.

(1) अँटिऑक्सिडंट मिळते (2) रोग होण्याची शक्यता

(3) पोटांचे विकार कमी होतात (4) विटामिन मिळते

**125.** आंब्याची कोणती प्रजाती राजवटीच्या नावाने प्रसिद्ध आहे ?

(1) लंगडा (2) दशेरी (3) मल्लिका (4) बंगनपल्ले

**126.** महाराष्ट्रात फारसा परिचित नसलेला आंबा कोणता ?

(1) केशर (2) रासपुरी (3) मनोहर (4) नीलम

**127.** 'शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते'. या वाक्यातील क्रियापद शोधा.

(1) शक्ती (2) वाढते (3) शरीर (4) प्रतिकारक

**128.** 'किरकोळ', 'तात्पुरता' या आशयाचा कोणता शब्द उताऱ्यात आहे ?

(1) जुजबी (2) घासाघीस (3) विकार (4) शर्यत

www.careerindia.com

CAREERINDIA

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

कोणत्याही ऋतूत पांदीकडेच्या कोणत्या ना कोणत्या वनस्पतींना फुलांचा-फळांचा बहर असायचाच. या पांदीतून चालताना हात लांब करून चिंचेचा पाला ओरबडून चघळणे, कच्ची बोरे, करवंदे काढून तोंडात टाकणे, घाणेरीच्या जांभळ्या-काळ्या फळांचे गेंद खुडून चालताना एका एकाची रुची चाखणे हे मला फार आवडायचे. शिवाय निरनिराळी फुले तोडायची ती निराळीच. एक गुराखी मुलगा आपल्या म्हशीच्या पाठीवर आरामात झोपून या पांदीतून जाता-जाता हा बाजूचा मेवा काढून तो मटकावत आराम प्रवास करायचा. ते बघायला गंमत वाटायची. शेतावरचे माळवे आणायला भागूबाई निघाली, की मी तिच्या मागून जात असे. मला या पांदीच्या वाटेने जाणे फार आवडायचे. सत्याप्पा शेतावर कामाला निघाला, की मी निघालेच. खांद्यावर शेतीचे अवजार, हातात बैलांचे कासरे असा तो निघाला, की मागून मी.

या पांदीत रहदारी अशी ठरावीक वेळीच. सकाळी दिसते न दिसते तो शेतावर कामाला निघालेल्यांची. जरा ऊन वर आले, की गोवारी खिल्लारी आणि त्यांच्या पाल्यांची. दाटीवाटीने एकमेकाला ढुशा देत निघालेल्या त्या गजगामिनी म्हशी आपल्या डोळ्यातील पांढरे दाखवीत फुस्स करून तिरक्या नजरेने रोखून बघू लागल्या, की कुठे पळू व्हायचे. शिंगांनी एकमेकींना टोकत निघालेल्या गोमातादेखील हलकीशी लाथ द्यायला कमी करायच्या नाहीत. पांदीतून बाजूला पळायला वाव नसतो. पुढे तरी पळा किंवा मागे तरी. यावेळी जाणे जरा अवघडच. अगदी मागे राहावे तो नाका-तोंडातून धूळच धूळ. पण हे सगळे सोसूनही जायला हवे असायचे. कारण कळपांचे गोवारी कधी त्या गुरांच्या मधून चालत, कधी गुरावर बसून पावा वाजवीत. पावा-बासरीचा तो स्वरसमूह किती ऐकावा तेवढा थोडाच वाटे.

ही वर्दळ संपली, की तीन-चार तास पाणंद स्वस्थ असायची. चढत्या उन्हात पेंगत असायची. सूर्य डोक्यावर आला, की पुन्हा जागी व्हायची. आता या पांदीतून रंगी-बेरंगी धडोती नेसलेल्या गावच्या सुना-लेकी जात असायच्या. या पाखरांच्या थव्यासारख्या तिनापाचाच्या घोळक्याने चालत. डोक्यावर पाटीत तीन-चार लोटकी कालवण-कोरड्यासाची, दही-ताकाची. फडक्यात बांधलेली भाकरीची चळत, काखेत घागर आणि हातात, तांब्या दुसऱ्या हातात एखादा फाटा-जनावरांना दूर करण्यासाठी. शेतावरील घरच्या माणसांसाठी न्याहरी नेणाऱ्या या मुली. पावलांना सोबत थट्टा मस्करी, राग-लोभ सर्व काही. बरोबर अनवाणी पायातील जोडव्यांची किणकिण. रिकाम्या पाट्या घेऊन या परतल्या, की पाणंदीला पुन्हा विश्रांती ती तिन्हीसांजेपर्यंत.

**129.** 'पुढे तरी पळा किंवा मागे तरी' यातील 'तरी' हे काय आहे ?

(1) उभयान्वयी अव्यय
(2) सकर्मक क्रियापद
(3) केवलप्रयोगी अव्यय
(4) शब्दयोगी अव्यय

**130.** 'पांदी'/'पाणंद' म्हणजे काय ?

(1) गावच्या सुना-लेकी
(2) पाखरांचा थवा
(3) शेतातून जाणारी अरुंद वाट
(4) शेतावर काम करणारा मजूर

www.careerindia.com

**131.** '<u>गजगामिनी</u> म्हशी' यातील अधोरेखित काय आहे ?

(1) कर्ता (2) विशेषण (3) नाम (4) कर्म

**132.** प्रस्तुत उताऱ्यात पुढीलपैकी कोणत्या फळाचा उल्लेख आलेला नाही ?

(1) बोरं (2) करवंदं (3) आवळा (4) चिंच

**133.** उताऱ्यातील 'धडोती' या शब्दाचा अर्थ काय ?

(1) वस्त्र (2) उपरणे (3) शेला (4) कुंकू

**134.** 'सत्याप्पा शेतावर कामाला निघाला'. या वाक्यातील कर्म ओळखा.

(1) कामाला (2) निघाला (3) सत्याप्पा (4) शेतावर

**135.** पाणंद कधी स्वस्थ व्हायची ?

(1) तिन्हीसांजी (2) पहाटे (3) सकाळी (4) दुपारी

**136.** 'प्रदूषण' या विषयावर अभ्यास ठरवताना तुम्ही कोणती गोष्ट सर्वात अगोदर करायला पाहिजे ?

(1) अध्यापन सामग्रीची निवड (2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची रचना

(3) परिचयात्मक प्रश्न तयार करणे (4) विषयाचे वारंवार वाचन करणे

**137.** शिक्षिका वर्गात सामूहिक चर्चा आणि सवंगड्यासोबत चर्चा याचे वर्गात आयोजन करते. ती उच्चारण आणि स्पेलिंग याकडे फारसे लक्ष देत नाही. ती कोणत्या पद्धतीचा अवलंब करते ?

(1) संरचनात्मक (Structural)

(2) रचनात्मक (Constructivist)

(3) पारंपारिक (Traditional)

(4) ऐच्छिक (Eclectic)

www.careerindia.com

CAREERINDIA

**138.** शिक्षिका विद्यार्थ्यांना 'पाणी' या विषयावर परिच्छेद लिहायला सांगते. विद्यार्थी ते विज्ञान आणि समाजविज्ञानाच्या वर्गात काय शिकले. यावर चर्चा करतात आणि नंतर परिच्छेद लिहायला सुरुवात करतात. हे कशाचे उदाहरण आहे ?

(1) अभ्यासक्रमापलिकडे जाणारी भाषा

(2) संज्ञापनात्मक पद्धती

(3) वापरातील भाषा

(4) विज्ञानाची भाषा

**139.** मुले उत्तम प्रकारे भाषा शिकतात जेव्हा __________.

(1) त्यांना मोकळेपणा वाटत नाही

(2) त्यांना प्रेरणा मिळते

(3) त्यांचे शिक्षक ओघवते बोलतात

(4) त्यांना उत्तम पाठ्यपुस्तक मिळते

**140.** शिकवत असताना तुमच्या लक्षात येते की पाठ्यपुस्तकात सुरुवातीला गाणी आणि चित्रकथा आणि शेवटी मुळाक्षरे आहेत. भाषा शिक्षणात या प्रकारच्या व्यवस्थेचा पुरस्कार कोणती पद्धती करते ?

(1) निवड पद्धती (Eclectic approach)

(2) कलात्मक (Aesthetic approach)

(3) ऊर्ध्वगामी (Bottom up approach)

(4) अधोगामी (Top down approach)

**141.** शाळेत जाणार असल्यामुळे राजू आज खूप खुश आहे. कुटुंबातील तो शाळेत जाणारा पहिला आहे. त्याच्या कुटुंबातील कोणीही, अगदी आई-वडील सुद्धा, कधीही शाळेत गेले नव्हते. राजू हा कोणत्या प्रकारचा विद्यार्थी आहे ?

(1) परिघाबाहेरचा

(2) अल्पसंख्यांक

(3) पहिल्या पिढीचा

(4) दुसऱ्या पिढीचा

www.careerindia.com

CAREERINDIA

**142.** वर्गात 'काळ' ही संकल्पना शिकविण्यासाठी तुम्ही एकाच माणसाचा एक 15 वर्षांपूर्वी काढलेला आणि एक नुकताच काढलेला फोटो वापरता. तुम्ही चर्चेला सुरुवात करून त्याचे आत्ताचे नि मागचे दिसणे, त्याच्या सवयी यावर बोलता. तुम्ही __________ याचा वापर करता.

(1) शिक्षणशास्त्रीय व्याकरण (Pedagogical)

(2) नियमाधारित व्याकरण (Rule Based)

(3) निर्देशित व्याकरण (Prescriptive)

(4) संरचनात्मक व्याकरण (Structural)

**143.** शिक्षिका वर्गात वास्तव जीवनातील, छत्री, रेनकोट, स्क्रू ड्रायवर सारख्या वस्तू आणते. ती मुलांना दोन तीन वाक्यांत वस्तूंचे वर्णन करण्यास सांगते. तिने वर्गात आणलेल्या वस्तूंना तांत्रिक दृष्ट्या काय म्हणता येईल ?

(1) यंत्र (2) रेलिया (Realia)

(3) भाषा आदान (4) शैक्षणिक साधने

**144.** 'विद्यार्थ्यांनी प्रश्न सामूहिकपणे सोडवावे, जोडीने किंवा गटातून' हे कोणत्या पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे ?

(1) समग्रभाषा पद्धती (2) संरचनात्मक पद्धती

(3) संभाषणात्मक भाषा अध्यापन (4) वर्तनवादी पद्धती

**145.** शिक्षक या नात्याने तुमच्या लक्षात येते की पाठातली भाषा ही विद्यार्थ्यांसाठी कठिण आहे. तुम्ही भाषा सोपी करता आणि तुमच्या विद्यार्थ्यांच्या अनुरूप आशयात बदल करता. तुमची ही कृती म्हणजे __________.

(1) मूल्यमापन (2) परीक्षण

(3) अंगीकारणे (Adopting) (4) माध्यमांतर (Adaptation)

**146.** विशिष्ट इयत्ता किंवा अभ्यासक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांने आत्मसात करावयास पाहिजेत असे ज्ञान, कौशल्य आणि वर्तन यांचे वर्णन असलेला अहवाल म्हणजे __________.

(1) अंकसाक्षरता फलित (2) मूलभूत साक्षरता फलित

(3) अध्यापन फलित (4) अध्ययन फलित

www.careerindia.com

CAREERINDIA

**147.** भाषाशास्त्रीय क्षमता विद्यार्थ्यांना कशाप्रकारे मदत करते ?

(1) भाषेचा योग्य वापर केव्हा आणि कसा करायचा ते जाणण्यास

(2) इंग्रजीचा अधिकाधिक वापर करण्यास

(3) व्याकरणदृष्ट्या बरोबर किंवा चूक वाक्यरचना ओळखण्यात

(4) व्याकरणदृष्ट्या सदोष असूनही ओघवते बोलण्यात

**148.** प्राथमिक पातळीवर शिक्षक साधारणपणे विद्यार्थ्यांना रंग भरण्यास रेखांकन करण्यास प्रवृत्त करतात. याचा कोणता लाभ होतो ?

(1) विद्यार्थ्यांचे मनोरंजन.

(2) शिक्षकांना अध्यापनातून विश्रांती.

(3) वर्गात शांतता राहण्यासाठी विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यात.

(4) उत्तम गतिबोधन क्षमता विकसित होते.

**149.** तुमचा जन्म आणि वाढ अशा गावात होते जिथे सगळी माणसे हिंदी बोलतात. तुम्हीही कुठल्याही शाळेत न जाता ती भाषा वापरू लागता. नंतर जेंव्हा तुम्ही शाळेत जाता, तेव्हा तुम्ही इंग्रजी, संस्कृत, हिंदी आणि उर्दू शिकता. आता तुम्ही धाराप्रवाह इंग्रजी बोलता. तुमची पहिली भाषा कोणती ?

(1) उर्दू (2) संस्कृत (3) इंग्रजी (4) हिंदी

**150.** जेव्हा भाषा कोणत्याही पद्धतशीर सरावाशिवाय नैसर्गिकपणे शिकली जाते, तेव्हा तिला __________ म्हणतात.

(1) स्वीकार्यता (2) शिकणे

(3) पांडित्य (Erudition) (4) आत्मसात करणे

www.careerindia.com

- o O o -

SPACE FOR ROUGH WORK

www.careerindia.com

CAREERINDIA

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

www.careerindia.com

CAREERINDIA

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

www.careerindia.com